

# कारमधील प्रवास सुरक्षित

**भारत न्यू कार असेसमेंट प्रोग्रॅम (एनसीएपी) या उपक्रमाचा केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी शुभारंभ केला. रस्ते अपघाताच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर नवीन प्रणाली लाँच करण्यात आली असून, यामुळे वाहनधारकांना अधिक सुरक्षितता प्राप्त होणार असल्याचे सांगण्यात येते. एनसीएपीबाबत थोडक्यात माहिती.**

### उद्देश काय?

महामार्गावरील सुरक्षेसह मोटारगाड्यांमध्ये अपघात प्रतिरोधक यंत्रणा बसविण्यासाठी एनसीएपीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.



### निर्यातीला चालना

या प्रणालीमुळे कार निर्मिती प्रकल्पांना निर्यातीला चालना मिळेल. ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये जगात अव्वल स्थानी पोहोचण्याचा केंद्राचा मानस आहे.

### कंपन्यांचा प्रतिसाद

मारुती सुझुकी, हुंदाई, महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा आदी कंपन्यांनी या उपक्रमास प्रतिसाद दिला आहे.

### मानकानुसार उत्पादन

ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्स १९७ च्या मानकानुसार कार उत्पादक कंपन्यांना नव्या कारची निर्मिती करावी लागणार आहे. अपघात झाल्यानंतर जीवितहानी टाळण्यासाठी कारमध्ये सुरक्षित यंत्रणा बसविण्यात येणार आहे. कारमधील सुरक्षेच्या मानकाची चाचणी होणार .

### स्टार रेटिंग होणार

प्रौढ आणि मुलांच्या सुरक्षेविषयी केलेल्या उपाययोजना पाहून स्टार रेटिंग देण्यात येणार आहे. सुरक्षेची मानके ठरल्यामुळे ग्राहकांना गाडी खरेदी करताना योग्य मार्गदर्शन होईल.

### ७०-अ फॉर्म बंधनकारक

कार उत्पादक कंपनी अथवा निर्यातदार यांना यापुढे सुरक्षेसाठी केंद्राला फॉर्म ७०-अ द्यावा लागणार आहे.

### ३.५ टन वजनाच्या वाहनांची चाचणी

३.५ टन वजनाच्या एसयूव्हीसह ८ आसन क्षमतेच्या अन्य मोटारगाड्यांमध्ये यापुढे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांनुसार ग्राहकांच्या सुरक्षेला प्राधान्य मिळणार.

● **महामार्गावरील ब्लॅक स्पॉट काढण्यासाठी ४० हजार कोटींची तरतूद**

## व्याघ्र तस्कर बावरिया याला पोलिसांकडून अटक

**भोपाळ :** कुख्यात आंतरराष्ट्रीय व्याघ्र तस्कर कल्ला बावरिया याला मध्यप्रदेश पोलिसांनी अटक केली आहे. गडचिरोली आणि ताडोबा येथील वाघांच्या शिकारीत देखील कल्ला बावरियाचा सहभाग होता. काही वर्षांपासून पोलिस त्याच्या मागावर होते. मेळघाटासह अनेक राज्यांतील वाघांच्या शिकार प्रकरणात त्याचा सहभाग राहिला आहे. गेल्या दहा वर्षांपासून तो फरार होता. महाराष्ट्रासह तामिळनाडू, आसाम, मेघालयामध्ये वाघांची शिकार करण्यात सहभाग होता. वाघाची कातडी, अवयव, हाडे जप्त करण्यात आले आहे. तसेच या अगोदर बावरिया टोळीच्या अनेक सदस्यांना अटक करण्यात आली आहे.






# ब्रिक्समधून बहुउद्देशीय करार होणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी; सदस्य देशांत परस्पर सहकार्य वाढणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश असलेल्या ब्रिक्स या संघटनेच्या माध्यमातून विकासासह चिंतेच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी व्यापक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

ब्रिक्स सदस्य राष्ट्रांच्या परिषदेसाठी मोदी दक्षिण आफ्रिकेला रवाना झाले आहेत. २२ ते २४ ऑगस्ट रोजी जोहान्सबर्ग या ठिकाणी परिषद होणार आहे. तत्पूर्वी, त्यांनी निवेदन जारी केले आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, दक्षिण आशियाई देशांसह जगातील अन्य देशांसोबत संबंध प्रस्थापित करण्यासाठी ब्रिक्स महत्त्वपूर्ण भूमिका निभावणार आहे. सदस्य राष्ट्रांमधील एकमेकांचा विकास आणि भेडसावणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी ब्रिक्सच्या व्यासपीठाचा उपयोग होणार आहे. भविष्यात कोणकोणत्या क्षेत्रांत सहकार्य करता येईल, याबाबतही बैठकीत चर्चा होईल. संस्थात्मक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले टाकता येणार आहेत. या परिषदेमध्ये विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य आणि भागीदारी करण्याबाबतच्या करारावर सहमती होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि जिनपिंगही या दौऱ्यात सहभागी होणार असल्याचे चीनच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. दरम्यान, मोदी आणि जिनपिंग यांची या परिषदेत वन टू वन चर्चा होणार की नाही, याबाबत मात्र दुजोरा मिळू शकलेला नाही. ब्रिक्स संघटनेमध्ये आणखी काही देशांचा समावेश करण्याबाबतही या परिषदेत चर्चा होणार आहे.



### ४० वर्षांत ग्रीसला पहिल्यांदाच भारतीय पंतप्रधानांची भेट

ब्रिक्स परिषदेनंतर ते अथेन्स, ग्रीसला भेट देणार आहेत. गेल्या ४० वर्षांत ग्रीसला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान ठरण्याचा मान आपणास मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. दोन्ही देशांना हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा आहे. त्यामुळे ग्रीस दौऱ्यात उभय देशात बहुउद्देशीय करारांवर स्वाक्षरी करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## सत्तेत आल्यावर मध्यप्रदेशात जातीनिहाय जनगणना करणार

**सागर : वृत्तसंस्था**

मध्यप्रदेशमध्ये सत्तेत आल्यानंतर राज्यात जातीनिहाय जनगणना करणार असल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली.

● **काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे; भाजपचा घटना बदलण्याचा डाव**

मध्यप्रदेशातील बुंदेलखंड भागात आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले, मध्यप्रदेश विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला विजय मिळाल्यास जातीनिहाय जनगणना केली जाईल. केंद्र सरकारचा राज्यघटनेवर घाला घालण्याचा डाव आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महु येथे जन्म झाला होता. देशातील १४० कोटी जनता भाजपला कदापिही राज्यघटना बदलू देणार नाही.२०११ च्या सामाजिक-आर्थिक जनगणनेनुसार मध्यप्रदेशातील दलितांची लोकसंख्या १ कोटी १३ लाख होती. केंद्रात नऊ वर्ष भाजपचे सरकार असून, मध्यप्रदेशात शिवराज सिंह चौहान १८ वर्षांपासून सत्तेत आहेत. निवडणुका आल्या की यांना रोहिदास आठवतो, असा टोलाही त्यांनी लगावला.


### नगरपरिषद उमरखेड जि. यवतमाळ
### ई. निविदा सुचना क्र. ०८/२०२३-२०२४

नगरपरिषद उमरखेडच्या वतीने खालील कामांच्या ई. निविदा महाराष्ट्र शासनाचे तत्सम खात्यात पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गातील कंत्राटदाराकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या B-1 नमुन्यामध्ये मागविण्यात येत आहेत. कामाच्या निविदा केवळ ई. निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २१/०८/२०२३ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | अनामत रक्कम | को-या निविदाची किंमत | काम पुर्ण करण्याची अवधी |
|---|---|---|---|---|---|
| | वैशिष्टपूर्ण योजना | | | | |
| १ | उमरखेड नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ मधील आनंद नगर मधील ओपन स्पेसचे लादिकरण करणे व सौंदर्यीकरण करणे, महसूल कॉलनी मधील ओपन स्पेसमध्ये लादिकरण करणेसह बेंच बसविणे व सौंदर्यीकरण करणे. व लक्ष्मी नगर मधील ओपन स्पेस मधील सुशोभिकरण करणे. | २३,०९,९०६/- | २४,०००/- | २,०००/- | १८० दिवस |

**ई - निविदा पध्दतीचा तपशिल -**
ऑन लाईन निविदा विक्री : दिनांक २१/०८/२०२३ ते दिनांक ०५/०९/२०२३
ऑन लाईन निविदा स्विकृती : दिनांक - २९/०८/२०२३ ते दिनांक ०५/०९/२०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत
ऑन लाईन निविदा उघडणे : शक्यतो दिनांक ०७/०९/२०२३ दुपारी १.०० वाजता
निविदेच्या सविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळतील.

**मुख्याधिकारी,**
**नगरपरिषद उमरखेड**


# पाकिस्तानी लोक ही भारताची खरी संपत्ती : मणिशंकर अय्यर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारत जगात विश्वगुरू होऊ इच्छितो. मात्र, आपल्या प्रवासात पाकिस्तानचा मोठा अडथळा असल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक स्थान मिळविणे अशक्य आहे, असे प्रतिपादन काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांनी केले.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीमध्ये ते म्हणाले की, भारत-पाकिस्तानमध्ये संवाद सुरू झाला पाहिजे. भारताला जगात नावलौकिक मिळवायचा असल्यास पाकिस्तानची धोंड बाजूला काढण्याची गरज आहे. यासाठी पाकसोबत चर्चा करून संवादाच्या माध्यमातून वादग्रस्त विषयावर तोडगा काढला पाहिजे. भारताची खरी संपत्ती पाकमध्येच आहे. तेथील लोक भारताकडे शत्रू म्हणून बघत नाहीत. पाकिस्तानी चित्रपट, पुस्तक आदींवर बंदी घालून उपयोग नाही. कारण पाक लोक भारताला शत्रू मानत नाहीत. त्यामुळे भारताने पाकमधील राजकीय पक्षांकडे शत्रू म्हणून बघावे. पाकमधील लोक हीच आपली संपत्ती आहे. राजदूत म्हणून काम करताना पाकमध्ये आपण तीन वर्षे होतो. या कालावधीत आपण लाखो व्हिसा मंजूर केले; मात्र एकही तक्रार आली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या नऊ वर्षांपासून पाकसोबतची चर्चा थांबवली असल्याचेही त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिले.

### पाकसोबत चर्चा आवश्यक; आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मजबूत होईल

## अमावस्येला पोलिस राहणार सतर्क !

**लखनौ :** उत्तरप्रदेशमधील पोलिस महासंचालक विजयकुमार यांनी पंचांग पाहून गुन्हेगारीवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. अमावस्येच्या आधी आठ दिवस आणि अमावस्येनंतर आठ दिवसांच्या कालावधीमध्ये गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.


### IndoStar Home Finance Private Limited

INDOSTAR
**Regd. Office: -** Unit No. 305, 3rd Floor, Wing 2/E, Corporate Avenue, Andheri- Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai – 400093
**CIN :** U65990MH2016PTC271587 **Tel:** +91 22 45107701
**Email:** contact@indostarhfc.com; **Website:** www.indostarhfc.com

**सूचना**

मुख्य निर्देश-बिगर बँकिंग वित्तीय कंपनी-गृह वित्त कंपनी (रिजर्व बँक) निर्देश, २०२१ च्या परिच्छेद ९३च्या तरतुदींनुसार इथे सूचना देण्यात येते की कंपनीचे शाखा कार्यालय **इंडोस्टार होम फायनान्स प्रा. लि., मनोज किराणा स्टोअरजवळ, पोचाम्मा गल्ली, लातूर, महाराष्ट्र-४१३५१२** येथे स्थित असलेले, जवळील शाखा कार्यालय **दुकान क्र. २०७ आणि २०८, यश प्लाझा, शिवनेरी गेटजवळ, कावा रोड, लातूर, महाराष्ट्र-४१३५१२** येथे सर्व व्यवहार स्थलांतरीत होत असल्याने, **२१ नोव्हेंबर, २०२३** रोजी व्यवहाराचे तास बंद झाल्यापासून बंद राहील. कोणतेही सहाय्य हवे असल्यास, तुम्ही वर नमूद केल्याप्रमाणे जवळच्या शाखा कार्यालयाशी संपर्क साधू शकता किंवा **contact@indostarhfc.com**
ही सूचना कंपनीचे संकेतस्थळ **(www.indostarhfc.com)** वर मिळू शकेल.

**इंडोस्टार होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडसाठी**
**स्वाक्षरी/-**
**निधी सादानी**
**कंपनी सेक्रेटरी**

दिनांक : २२-०८-२०२३


## लक्षद्वीप खासदारावर हत्येचा खटला

**नवी दिल्ली :** लक्षद्वीपमधील खासदार मोहम्मद फैजल यांच्यावरील हत्येचा खटला नव्याने सुरू करण्यास सर्वोच्च न्यायालयाने केरळमधील उच्च न्यायालयास निर्देश दिले. सत्र न्यायालयाने फैजल यांना हत्येच्या आरोपाखाली दहा वर्षांची शिक्षा सुनावली होती.

## दारूबंदीचा निर्णय मागे घ्यावा : मांझी

**पाटणा :** बिहारमध्ये विषारी दारूमुळे कित्येक लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री नितीशकुमार यादव सरकारने सरकारमान्य दारूबंदीचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी बिहारचे माजी मुख्यमंत्री जितनराम मांझी यांनी केली आहे. दारूबंदीचा निर्णय घेतल्यानंतर पाच लाख लोकांना अटक करण्यात आले असून, कित्येक लोकांचा मृत्यू झाला आहे.

## नूह हिंसाचारातील आरोपीस अटक

**नूह :** हरियानातील नूह हिंसाचारातील आणखी एक आरोपीस पोलिसांनी अटक केली. हिंसाचारातील आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांनी युद्धपातळीवर मोहीम हाती घेतली आहे. आरोपी लपून बसलेल्या ठिकाणी पोलिस गेले असता पोलिसांच्या दिशेने गोळीबार करण्यात आला.


### नामको बँक Namco Bank

(मल्टि-स्टेट शेड्यूल्ड बँक) (Multi-State Scheduled Bank)

**दि नासिक मर्चन्ट्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक** (मल्टि-स्टेट शेड्यूल्ड बँक)
**प्रशासकीय कार्यालय :** अे-१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबूभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक-४२२००७.
Ph. 0253 - 2308200 to 206 E-mail : ceo@namcobank.in Web Site : www.namcobank.in

जा.क्र. एचओ/एसएआर/लिलाव/०७/२०२३-२०२४ दिनांक : २३/०८/२०२३

### सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत जाहीर लिलाव विक्री नोटीस

**(दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या नियम ८ अन्वये)**

दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३(४) अन्वये सदरची मिळकत दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक यांचे अधिकृत अधिकारी यांच्या ताब्यात असून, सदरची अचल मिळकत **'जसे आहे, जिथे आहे'**, **'जसे आहे जे आहे'** व **'जे काही आहे ते'** या तत्त्वावर विक्री करणेकामी तमाम लोकांकडून लिलाव बोली मागविण्यात येत आहे.

अधिकृत अधिकारी यांना सदर कायद्याच्या कलम १३(१२) व नियम ९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार थकीत कर्ज रकमेच्या वसुलीसाठी सदरची मिळकत नियम क्रमांक ८ व ९ अन्वये विक्री करण्याचे ठरविलेले आहे.

| अ. क्र. | कर्जदार व जामीनदार नावे | मालमत्तेचे वर्णन | शाखेचे नाव/ पत्ता व संपर्क क्रमांक | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण | मागणी व ताबा नोटीस दिनांक | देय रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :** मे. मंगलम गारमेंटस् (भागीदारी फर्म) तर्फे **भागीदार -** अ) श्री. नेवासेकर अंशुमन लक्ष्मीकांत ब) सौ. नेवासेकर पूनम अंशुमन **जामीनदार व संमतीदार -** १) श्री. सोनी बालाप्रसाद गोविंदलाल २) श्री. नागरे प्रसाद दिलीप ३) श्री. नेवासेकर अंशुमन लक्ष्मीकांत ४) सौ. नेवासेकर पूनम अंशुमन | तुकडी जिल्हा जालना, पोटतुकडी तालुका जालना पैकी जालना नगरपालिका हद्दीतील जालना कपडा बाजार, फुलबाजार चौक येथील स्थावर मिळकत हिचा सिटी सर्व्हे नं. ३१६९, यांसी क्षेत्रफळ ८५.२० चौ.मी. यावरील मंजूर प्लॅनप्रमाणे बांधीव तीनमजली इमारत, यांसी क्षेत्रफळ १२३.५५ चौ.मी. म्हणजेच १३२९ चौ. फूट, यांसी चतु:सीमा :- पूर्वेस : अरुंद गल्ली, पश्चिमेस : रोड, दक्षिणेस : सिटी सर्व्हे नं. ३१७०, उत्तरेस : सिटी सर्व्हे नं. ३१६८ | दि नासिक मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक, **शाखा जालना** घर नं. १/२४/३० आणि ३१, तळमजला, सदर बाजार, शोला चौक, जालना - ४३१ २०३ फोन नं. (०२४८२)- २३६१०७ | **मंगळवार, १२ सप्टेंबर २०२३** सकाळी - ११ ते दुपारी १ वाजेपावेतो दि नासिक मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक प्रशासकीय कार्यालय : ए/१६, औद्योगिक वसाहत, बाबूभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र मार्ग, सातपूर, नाशिक-४२२००७ फोन नं. ०२५३-२३०८२०० ते २३०८२०६, मो.नं. ९८५०००९६६६, ९४२३२५६१०१ | मागणी नोटीस दि. ११.१०.२०१९ प्रतीकात्मक ताबा नोटीस दि. १८.०८.२०२० प्रत्यक्ष ताबा दि. २८.०३.२०२३ | रुपये ६५,९६,८५८.२९/- (रुपये पासष्ट लाख शहान्नव हजार आठशे अठ्ठावन्न रुपये एकोणतीस पैसे मात्र) तसेच त्यावर दिनांक ०१/१०/२०१९ पासून पुढील व्याज + खर्च |

| | |
|---|---|
| आरक्षित किंमत | रु.१,१७,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी सतरा लाख मात्र) |
| ईएमडी रक्कम राखीव किमतीच्या १० टक्के | ११,७०,०००/- |
| बोली वाढ रक्कम | रु.२५,०००/- च्या पटीत |

**अनामत रक्कम (EMD) (अपात्र खरेदीदारांना परत करण्यात येईल) :** लिलावामध्ये नमूद केलेल्या आरक्षित किमतीच्या १० टक्के रकमेचा डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर **'दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक'** यांचे नावाने, **सोमवार, ११ सप्टेंबर२०२३** रोजी अथवा पूर्वी सायंकाळी ४ वाजेपावेतो **बँकेच्या जालना शाखेत** किंवा **थकबाकी विभाग, प्रशासकीय कार्यालय, सातपूर, नाशिक** येथे आपले अर्जासोबत पॅनकार्ड व आधारकार्ड जोडून एकत्रित पाठविण्यात यावे. अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. त्याचप्रमाणे लिलावासोबत जोडण्यात आलेला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर न वटल्यास सदरचे बोली नामंजूर करण्यात येईल व लिलावात भाग घेता येणार नाही.

**विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेची पाहणी व माहिती : सोमवार, दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११ ते १** वाजेपर्यंत इच्छुक खरेदीदार मालमत्तेची पाहणी करू शकतील व त्या संबंधित अधिक माहिती अधिकृत अधिकाऱ्यांच्या पूर्व अनुमतीने बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात अथवा **जालना शाखा** येथे येऊन घेता येईल.

कर्जदार, जामीनदार व संमतीदारांसाठी सरफेसी ॲक्ट २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना

**नियम व अटी :** अ) लिलाव नाकारण्याचे, स्थगित करण्याचे, लिलावाच्या तारीख व वेळ पुढे ढकलण्याचे, विक्री कन्फरमेशन देण्याचे संपूर्ण अधिकार, कुठलेही कारण न देता अधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत. या संदर्भातील अधिकृत अधिकाऱ्याचे निर्णय अंतिम राहतील व कोणत्याही प्रकारची तक्रार स्वीकारली जाणार नाही. तसेच स्पष्टीकरणही दिले जाणार नाही. ब) गहाणकर्ता/ कर्जदार / जामीनदार व संमतीदार इच्छुक खरेदीदारांना लिलावात भाग घेण्यासाठी आणू शकतात व लिलावाच्या वेळी हजरही राहू शकतात. क) ज्याला लिलाव मंजूर करण्यात येईल त्याने मंजूर लिलावाच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम (१० टक्के अनामत रकमेसह) ताबडतोब बँकेत भरणा करावयाची आहे. उर्वरित रक्कम लिलाव झालेल्या तारखेपासून १५ दिवसांचे आत भरणा करावयाचा आहे. ड) यशस्वी खरेदीदार बोलीमधील रकमेच्या ७५ टक्के रक्कम लिलाव झालेपासून १५ दिवसांचे आत रक्कम भरू शकला नाही, तर ईएमडी म्हणून भरलेली रक्कम १० टक्के + १५ टक्के ही रक्कम जप्त करण्यात येईल व मिळकत फेरलिलावासाठी ठेवण्यात येईल. ई) यशस्वी खरेदीदार यांनी ५० लाखांवरील भरणा रकमेवर १ टक्के टीडीएस अदा करावयाचा आहे. फ) हस्तांतरणासाठी कायदेशीर खर्च, प्रवास, स्टॅम्प ड्यूटी, विक्री कर, रजिस्ट्रेशन खर्च, महानगरपालिका / नगरपालिका घरपट्टी, सोसायटी मेन्टेनन्स, पाणीपट्टी, वीजबिल लागू असेल त्याप्रमाणे इतर सर्व खर्च खरेदीदार यांनी सोसावयाचे आहेत व लागू असलेल्या मिळकत तबदिलीच्या सर्व प्रक्रिया खरेदीदार यांनी करावयाच्या आहेत. सदर मराठी नोटीस ही इंग्रजी नोटिसीचा अनुवाद आहे. काही अडचण आल्यास इंग्रजी नोटीस ही ग्राह्य धरण्यात येईल. या सर्व संदर्भातील अधिकृत अधिकारी यांचा निर्णय अंतिम व अबाधित राहील. ग) स्थावर मालमत्तेची विक्री **'जेथे आहे, जशी आहे'** या तत्त्वावर आणि जर अन्य काही बोजा असेल, तर त्यासह करण्यात येईल. (बँकेकडील माहितीनुसार मालमत्तेवर बोजा नाही.)

सही /- **अधिकृत अधिकारी**
दि नासिक मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नाशिक
(मल्टि-स्टेट शेड्यूल्ड बँक)



### नगरपरिषद किल्ले धारूर

**निविदा दरपत्रक सुचना / संकिर्ण विभाग / सुचना क्र.०१/२०२३-२४**

नगर परिषद किल्ले धारूरकडील सन २०२३-२०२४ या वर्षासाठी खालील २५ (पंचविस) कामांची योग्य पुरवठा धारक/ डिलर/विक्रेते/ दुकानदार कंत्राटदाराकडुन विहीत नमुन्यात ऑफलाईन सिलबंद द्वि लिफाफा निविदा दरपत्रक मागविण्यात येत असुन निविदा विषयीच्या अटी-शर्ती व सूचनाची माहिती नगर परिषद कार्यालयात खालील नमूद कालावधीत उपलब्ध असेल. निवीदा फॉर्म विक्री व स्विकृतीची कार्यवाही खाली दिलेल्या कालावधीत नगर परिषद कार्यालय किल्ले धारुर येथे ऑफलाईन करण्यात येईल.

निवीदा फॉर्म विक्री व स्विकृती दिनांक २२/०८/२०२३ रोजी सकाळी वेळ १०.०० वा. पासुन दिनांक ३०/०८/२०२३ रोजी सांय ०६.०० पर्यंत राहिल. तसेच निविदा लिफाफा क्र. ०१ तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक ३१/०८/२०२३ रोजी नंतर कार्यालयीन वेळेत राहील.

| अ. क्र | कामाचे नाव | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोरी निविदा किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्टेशनरी साहित्य पुरविणे (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | | १०००/- |
| २ | छपाई व बायंडिंग करणे (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ३ | झेरॉक्स व फैक्स प्रत पुरविणे (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ४ | स्वच्छता विभागास आवश्यक जंतूनाशके पुरविणे (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ५ | स्वच्छता विभाग आणि कार्यालयासाठी आवश्यक साहित्य पुरविणे करिता (निविदेतील यादी प्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ६ | गणवेश, शॉल, टोपी व इतर आवश्यक कापडी साहित्य पुरवठा करणे (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ७ | संगणक, प्रिंटर व स्कॅनर दुरुस्ती व साहित्य पुरवठा करणे (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ८ | व्हिडीओ शुटींग फोटो काढणे/ऑनलाईन जॉब वर्क कामे करुन सीडी /फोटो अल्बम / माहिती पुस्तीका तयार करुन पुरवठा करणे. (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ९ | मंडप (शामीयाना) विद्युत रोशनाई व कार्यक्रमासाठी आवश्यक इतर साहित्य पुरवठा करणे. (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १० | डिजीटल बॅनर छपाई करणे. (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| ११ | न.प. कार्यालयात चहा/नाष्टा पुरवठा करणे. (निविदेतील (यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १२ | स्वच्छता विभागासाठी जे.सी.बी. मशीन / डंपर / डंपिंग ट्राली ट्रॅक्टरसह (डिझेल / ऑईल / ऑपरेटर व हेल्पर यांचे मजुरीसह) पुरवठा करणे, (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १३ | बांधकाम विभागाअंतर्गत नगर पंचायत हद्दीतील बांधकामविषयक किरकोळ दुरुस्ती करणे. (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १४ | पाणीपुरवठा विभागाअंतर्गत मुख्य व शहरातील पाईपलाईन गळती दुरुस्ती करणे. (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १५ | आरोग्य विभागाकरिता लोखंडी अवजारे पुरवठा करणे | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १६ | पा.पु. विभागाकरिता ब्लीचिंग पावडर व तुरटी पुरवठा करणे. | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १७ | पा.पु. विभागासाठी विद्युत पंप मोटार दुरुस्ती व पाईपलाईन दुरुस्ती करणे | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १८ | स्वच्छता विभागातील वाहन दुरुस्ती करणे, | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| १९ | प्रवासासाठी भाडोत्री वाहनचालक व इंधन सह) पुरविणे (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| २० | विद्युत विभागातील पथदिवे दुरुस्तीसाठी विद्युत साहित्य पुरवठा करणे. | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| २१ | कार्यालयासाठी फर्निचर पुरवठा करणे. | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| २२ | नगरपरिषद कार्यालयाकडील वाहनांसाठी आवश्यक टायर (ट्युबसह) पुरवठा करणे. | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| २३ | अग्निशमन विभागासाठी आवश्यक साहित्य पुरवठा करणे. (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| २४ | नगरपरिषद कार्यालयासाठी आवश्यक ब्लुटुथ/जि.पी.एस. डिवाईस बसविणे व सेवा पुरवठा करणे. | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |
| २५ | वृक्षारोपण विभागासाठी आवश्यक ट्रि गार्ड पुरवठा करणे. (निविदेतील यादीप्रमाणे) | ३०००/- | १००००/- | कार्यादेशापासून १२ महिन्यांपर्यंत | १०००/- |

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
नगरपरिषद, किल्ले धारूर

**स्वाक्षरित/-**
**प्रशासक**
नगरपरिषद, किल्ले धारूर